# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.03.2025** **वारः गुरुवार**

---

**ठळक बातम्या**

- भारत आणि मॉरिशसदरम्यान सागरी सुरक्षितता आणि स्थानिक चलनात व्यापारवृद्धीसह आठ महत्त्वपूर्ण सामंजस्य करार. दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी मायदेशी परत.
- मुंबईमध्ये होणाऱ्या वेव्ज 2025 च्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रतिनिधींशी आज नवी दिल्लीत संवाद साधणार.
- अवकाश विकास संस्थेकडून अस्त्र या स्वदेशी बनावटीच्या हवेतून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी.
- पाकिस्तानमध्ये, जाफर एक्सप्रेस या पॅसेंजर रेल्वे गाडीवर झालेल्या हल्ल्यानंतरच्या संघर्षाची अखेर.346 ओलिसांना वाचवण्यात यश, तर 50 हल्लेखोर ठार.

  आणि
- नवी दिल्लीत सुरू असलेल्या जागतिक पॅरा ऍथलेटिक्स ग्रां प्रि 2025 मध्ये भारताचं वर्चस्व कायम.

**भारत-मॉरिशस**

भारत आणि मॉरिशसदरम्यान सागरी सुरक्षा आणि स्थानिक चलनात व्यापारवृद्धीसह आठ महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मॉरिशसचे पंतप्रधान डॉ. नवीनचंद्र रामगुलम यांच्यात पोर्ट लुईसमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. दरम्यान, मॉरिशसच्या यशस्वी दौऱ्यानंतर पंतप्रधानाचं आज सकाळी नवी दिल्लीत आगमन झालं आहे. काल झालेल्या चर्चेनंतर पंतप्रधान मोदी यांनी विकसनशील देशांबाबत विविध विभागांमध्ये सुरक्षा आणि विकासासाठी सहमतीनं आणि सर्वसमावेशक प्रगती म्हणजे महासागर या भारताच्या नवीन धोरणाची घोषणा केली. मॉरिशस आणि भारताची समान उद्दिष्टे लक्षात घेऊन भारत मॉरिशसला संरक्षण आणि सुरक्षाविषयक मदत सुरूच ठेवेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. काल मोदी मॉरिशसच्या राष्ट्रीय दिन समारंभात सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या समारंभात मोदी यांना ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन हा सन्मान मॉरिशसचे अध्यक्ष धरमवीर गोकुल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मॉरिशसचा हा सर्वोच्च सन्मान मिळवणारे मोदी हे पहिलेच भारतीय आहेत.

**वेव्ह्ज परिषद**

मुंबईमध्ये होणाऱ्या जागतिक दृकश्राव्य मनोरंजन परिषदेच्या म्हणजे वेव्ज 2025 च्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रतिनिधींशी आज नवी दिल्लीत संवाद साधणार आहेत. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही या कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत. माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील संधींबाबत अनेक देशांचे राजदूत आणि उच्चायुक्त बोलणार आहेत. या परिषदेचा पहिला टप्पा मुंबईत 1 ते 4 मे या कालावधीत होणार आहे.

**अस्त्र**

अवकाश विकास संस्थेने काल तेजस या लढाऊ विमानातून स्वदेशी अस्त्र या दृष्टीक्षेपाच्या पलीकडे हवेतून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची ओडिशाच्या चंडीपूर इथून  यशस्वी चाचणी घेतली. उडणाऱ्या लक्ष्यावर क्षेपणास्त्राचा थेट प्रहार यावेळी यशस्वी झाल्याचं दिसून आलं. संरक्षण संशोधन विकास संघटनेनं म्हणजे डीआरडीओनं तयार आणि विकसित केलेलं  अस्त्र हे क्षेपणास्त्र 100 किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरच्या लक्ष्याला अचूकपणे नष्ट करण्याकरता सक्षम आहे. हे क्षेपणास्त्र या आधीच भारतीय हवाई दलात समाविष्ट करण्यात आलं आहे. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी डीआरडीओ, हवाई दल, अवकाश विकास संस्था, हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड आणि चाचणीत सहभागी असलेल्या सर्व चमुचं  अभिनंदन केलं  आहे.

**स्पेसएक्स**

आंतरराष्ट्रीय अवकाशस्थानकाकडे जाण्यासाठीचं उड्डाण स्पेसएक्सनं शेवटच्या क्षणी लांबणीवर टाकलं आहे. भारताची अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि अमेरिकेचे अंतराळवीर बुच विलमोर या अवकाशस्थानकात अडकून पडले आहेत. त्यांच्या जागी इतर चार अंतराळवीर पाठवण्याची स्पेसएक्सची मोहीम आहे. सुनीता विल्यम्स आणि विलमोर गेले नऊ महिने या अवकाशस्थानकात अडकून पडले आहेत. पुढचं उड्डाण कधी होणार हे स्पेसएक्सनं अजून स्पष्ट केलेलं नाही. दरम्यान, दोन्ही अंतराळवीर सुरक्षित असल्याचं नासानं स्फष्ट केलं आहे.

**पाकिस्तान**

पाकिस्तानमध्ये, बोलन जिल्ह्यात जाफर एक्सप्रेस या पॅसेंजर रेल्वेगाडीवर झालेल्या मोठ्या हल्ल्यानंतर बलोच लिबरेशन आर्मीचे म्हणजे बीएलएचे बंडखोर आणि पाकिस्तानी सैन्यातील संघर्ष 24 तासांहून अधिक काळानंतर अखेर संपल्याचं वृत्त आहे. हल्लेखोरांना मारण्यासाठी आणि ओलिसांना सोडवण्यासाठीची लष्करी कारवाई मोहीम यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. किमान 346 ओलिसांना वाचवण्यात आलं असून 50 हल्लेखोरांना मारण्यात आलं. मात्र या संघर्षात 21 ओलिसांचा मृत्यू झाला आहे. बलुचिस्तानची राजधानी क्वेटाहून खैबर पख्तूनख्वाची प्रांतीय राजधानी पेशावरकडे जाणाऱ्या या रेल्वेगाडीचं काल बीएलएच्या बंडखोरांनी अपहरण करून 400 हून अधिक प्रवाशांना ओलिस म्हणून ठेवलं होतं. या संघर्षात वीसपेक्षा जास्त पाकिस्तानी सैनिकही मारले गेल्याचं वृत्त आहे.

**रशिया शस्त्रसंधी**

अमेरिका आणि युक्रेनदरम्यान सुरू असलेल्या चर्चेमधून पुढे आलेल्या शस्त्रसंधीच्या प्रस्तावाबाबत रशिया तपशीलांची प्रतीक्षा करेल, असं रशियानं म्हटलं आहे. सौदी अरेबियात जेद्दामध्ये विविध राजनैतिक स्तरांवर झालेल्या चर्चेबाबत रशियाला माहिती देऊ असं अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार माइक वॉल्झ यांनी सांगितल्याचं रशियाचे प्रवक्ते दिमित्री पेश्कोव्ह यांनी म्हटलं आहे. अमेरिकेच्या अधिकाऱ्यांसमवेत पुढच्या काही दिवसांमध्ये बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये आवश्यक तपशील पुरवले जातील, असं पेश्कोव्ह यांनी स्पष्ट केलं आहे. दरम्यान, जेद्दामध्ये झालेल्या चर्चेत रशियाशी युद्धाबाबत ताबडतोब आणि तीस दिवसांच्या हंगामी शस्त्रसंधीसाठी तयार असल्याचं युक्रेननं म्हटलं आहे. अमेरिका आणि युक्रेनच्या अधिकाऱ्यांमध्ये झालेल्या या चर्चेत युक्रेननं तीस दिवस शस्त्रसंधीसाठी तयारी दाखवली, तर अमेरिकेनं युक्रेनला दिलेल्या दिल्या जाणाऱ्या लष्करी मदतीवरील स्थगिती उठवण्याची तयारी दाखवली.
दरम्यान, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी आज रशियाच्या पश्चिम भागातील कुर्स्क भागाला अचानक भेट दिली.

**हरियाना मोदी**

हरियानात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल पंतप्रधान आणि पक्षाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आभार मानले आहेत. हा विजय म्हणजे मुख्यमंत्री नायबसिंह चैनी यांनी केलेल्या विकासकामांवर जनतेनं टाकलेल्या विश्वासाचं प्रतीक आहे असं मोदी यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. या निवडणुकीत दहापैकी नऊ नगर परिषदांमध्ये भाजपानं विजय मिळवला आहे.

**अमित शहा-दौरा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज अहमदाबादच्या दौऱ्यावर आहेत. ते विविध विकासकामांचं उद्घाटन करणार आहेत. दरम्यान 14 ते 16 मार्च दरम्यान आसामला भेट देणार आहेत. 15 मार्चला ते मिझोरामलाही जाणार आहेत. आसाम रायफल्सचा तळ ऐजॉलवरून झोखास्वांगमध्ये हलवण्याच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. अमित शहा सोळा मार्च रोजी गुवाहाटीत ईशान्येकडच्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधणार आहेत.

**बॅडमिंटन**

बर्मिंगहॅम इथे होणाऱ्या इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आज 16 व्या फेरीच्या सामन्यांमध्ये अनेक भारतीय बॅडमिंटनपटूंचे सामने होतील. पुरुष एकेरीत लक्ष्य सेनचा सामना इंडोनेशियाच्या तिसऱ्या मानांकित जोनाथन क्रिस्टीशी होईल. महिला एकेरीत, जागतिक क्रमवारीत 28 व्या मानांकित मालविका बनसोडचा सामना जपानच्या तिसऱ्या मानांकित अकाने यामागुचीशी होईल. पुरुष दुहेरीत, सातव्या मानांकित सात्विक-साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीने काल पहिल्या फेरीत डॅनिश जोडी डॅनिश लुंडगार्ड आणि मॅड्स वेस्टरगार्ड यांना पराभूत करून विजय मिळवला. आज झी हाओ नान आणि झेंग वेई हान यांच्याविरुद्ध ही जोडी खेळणार आहे. दरम्यान दोन वेळा ऑलिंपिक पदक मिळवलेली पी.व्ही. सिंधू आणि एचएस प्रणॉय हे पहिल्या फेरीतच स्पर्धेतून बाहेर पडले आहेत.

**पॅरा ॲथलेटिक्स**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स ग्रां प्रि 2025 मध्ये भारताचं वर्चस्व कायम आहे. भालाफेकीच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये पुष्पेंद्रसिंह, रिंकू हूडा आणि रितेंदर यांनी सुवर्णपदकं मिळवली. महिला विभागात भाग्यश्री जाधवनं बाजी मारली. थाळीफेक प्रकारात अतुल कौशिकनं सुवर्णपदक मिळवलं. दोन दिवसांतल्या विविध स्पर्धांमध्ये भारताची पदकसंख्या 95 वर गेली आहे. त्यात 33 सुवर्णपदकं, 29 रौप्य आणि 33 कास्यपदकांचा समावेश आहे.

**उष्णता लाट**

महाराष्ट्रात विदर्भासह ओडिशा आणि गुजरातमध्ये उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयात आज मुसळधार ते तीव्र मुसळधार पाऊस येण्याचाही अंदाज वर्तवण्यात आला आहे. पश्चिम बंगाल, सिक्कीम, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि दिल्लीमध्ये पुढच्या दोन-तीन दिवसांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता असल्याचंही हवामान विभागानं म्हटलं आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.**